**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – गजेंद्र खाशाबा भिसे

वय सुमारे– ५४ वर्षे, व्यवसाय– सहायक पोलीस उपनिरिक्षक

सध्या नेमणूक – कुडाळ पोलीस स्टेशन, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरू–</u>**

०१. दि. ०७/०९/२०१८ रोजी मी दूरक्षेत्र शिरोडा येथे कार्यरत होतो. त्यावेळी आम्हाला जॉन पेद्रू फर्नांडिस, रा. आजगांव, भोमवाडी, ता.सावंतवाडी हा आपल्या जवळ बेकायदेशीररित्या बंदूक बाळगत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सदरची माहिती मी पोलीस निरीक्षक खोत यांना दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक हे पोलीस दूरक्षेत्र शिरोडा येथे आले. त्यानंतर मी, मारुती कृष्णांत सोनटक्के, पो.कॉ. व योगेश वेंगुर्लेकर, पो.ना. असे आम्ही सर्वजण निरीक्षक यांच्या शासकीय वाहनातून आजगाव भोम या गावातील ख्रिश्चनवाडी या परिसरामध्ये जॉन पेद्रू फर्नांडिस यांच्या घरी गेलो. त्यावेळी जॉन फर्नांडिस याला त्याच्या घराच्या बाहेरुन हाक मारली असता तो घरातून बाहेर आला. त्यावेळी त्याच्याकडे बेकायदेशीर बंदुकीबाबत चौकशी केली असता त्याने त्याच्या घरामध्ये लपवून ठेवलेली एक सिंगल बॅरेल बंदुक आणून आमच्या ताब्यामध्ये दिली. त्यावेळी आम्ही घटनास्थळी दोन पंच नामे हनुमान रामचंद्र केदार व उदय विठ्ठल परब यांच्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. (साक्षीदाराला दि.०७/०९/२०१८ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. **<u>(घटनास्थळ पंचनाम्यास निशाणी–३४ देण्यात येते.)</u>** त्यानंतर आम्ही जॉन व त्याने दिलेली बंदुक घेवून शिरोडा दूरक्षेत्र येथे आलो. दूरक्षेत्रामध्ये मारुती सोनटक्के याने आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. त्यानंतर मी गुन्हयाचा प्राथमिक अहवाल दाखल करुन घेतला व त्याअनुषंगाने मी व मारुती सोनटक्के वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे आलो व त्यानंतर आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

०२. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच जप्त बंदूक ही मुद्देमाल कारकून यांच्याकडे देवून त्याअनुषंगाने मुद्देमाल पावती घेतली. (साक्षीदाराला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली.) त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. **(मुद्देमाल पावतीस निशाणी–३५ देण्यात येते.)** मी बंदूक तपासणीकरीता प्रयोगशाळेत पाठविण्याकरीता प्रभारी अधिकारी यांच्यामार्फत संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा कलिना मुंबई यांना पत्र पाठविले. दि.११/०९/२०१८ रोजी आरोपीला अटक करुन न्यायालयात हजर केले. प्रयोगशाळेमधील जप्त केलेली बंदूक ही अग्नीशस्त्र आहे असा अहवाल प्राप्त झाला. तपासादरम्यान माझ्या असे निदर्शनास आले की जॉन फर्नांडिस याने बेकायदेशीररित्या व विनापरवाना सदरची बंदूक ही आपल्या ताब्यात बाळगली होती. त्यानंतर मी न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले. आमच्या ताब्यात बंदूक दिलेला आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत सुरु–**

०३. मी पाच वर्षे दूरक्षेत्र शिरोडा येथे कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की पोलीस चौकीमध्ये हालचाल रजिस्टर असते. आम्ही मिळालेल्या माहितीबाबतची नोंद हालचाल रजिस्टरमध्ये केली नव्हती. मी पोलीस निरीक्षक यांना फोनद्वारे माहिती दिलेली होती. मी रजिस्टरमध्ये पोलीस निरीक्षक यांना माहिती कळविली याबाबतची नोंद घेतली नव्हती. पोलीस निरीक्षक हे दि.०७/०९/२०१८ रोजी माहिती मिळाल्यानंतर अंदाजे सकाळी ७.०० ते ७.३० वाजताच्या सुमारास दूरक्षेत्र येथे आले. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक दूरक्षेत्रावर वरिष्ठांच्या भेटीबाबतची नोंद ठेवणारे भेट रजिस्टर ठेवलेले असते. पोलीस निरीक्षक हे दि.०७/०९/२०१८ रोजी अंदाजे सकाळी ७.०० ते ७.३० वाजताच्या सुमारास दूरक्षेत्र येथे आले याबाबतची माहिती भेट रजिस्टरमध्ये आजतागायत घेण्यात आलेली नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे गुन्हयाच्या दिवशी मी शिरोडा दूरक्षेत्रावर प्रमुख होतो. हे म्हणणे खरे आहे की दूरक्षेत्र प्रमुख म्हणून पोलीस निरीक्षक यांच्या भेटीची नोंद भेट रजिस्टरमध्ये करणे हे माझे कार्यालयीन कर्तव्य होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की पोलीस निरीक्षक हे दूरक्षेत्रावर

आल्यानंतर आम्ही बाहेरुनच घटनास्थळी गेल्यामुळे मी त्यांच्या भेटीची नोंद भेट रजिस्टरमध्ये घेतली नाही.

प्रश्न – पोलीस निरीक्षक साहेबांच्या भेटीची नोंद भेट रजिस्टरमध्ये करण्यासाठी तुम्हाला घटनास्थळावरुन परत आल्यानंतर वेळ होता का ?

उत्तर – सदरची नोंद करण्याकरीता माझ्याकडे वेळ होता.

०४. हे म्हणणे खरे आहे की एखादा पोलीस अधिकारी हा आपले ऑफीस सोडून जात असल्यास त्याची नोंद हालचाल रजिस्टरमध्ये करणे कायद्याने बंधनकारक आहे. मी घटनास्थळी जात असताना माझ्या व मारुती सोनटक्के यांच्या हालचालीबाबतची नोंद देखील हालचाल रजिस्टरमध्ये केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की एखाद्या गुन्हयाची माहिती मिळाल्यास त्याची नोंद ठाणे दैनंदिनीमध्ये करणे आवश्यक नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशन सोडण्यापुर्वी त्याची नोंद ठाणे दैनंदिनीमध्ये करणे आवश्यक आहे. पोलीस निरीक्षक यांनी ठाणे दैनंदिनीमध्ये त्यांच्या हालचालीबाबतची नोंद केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. पोलीस निरीक्षक यांनी ठाणे दैनंदिनीमध्ये त्यांच्या हालचालीबाबतची नोंद केली किंवा कसे याबाबतची माहिती मी घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत गुन्हयाकामी दि.०७/०९/२०१८ रोजीचा ठाणे दैनंदिनीचा उतारा हजर करण्यात आलेला नाही.

०५. दि.०७/०९/२०१८ रोजी वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे दोन शासकीय वाहने होती. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक पोलीस स्टेशनला वाहनांच्या हालचालीची नोंद ठेवणारे रजिस्टर जतन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की वाहनाच्या हालचाल रजिस्टरमध्ये बाहेर जाणाऱ्या वाहनाचा नोंदणी क्रमांक व कोणत्या कारणास्तव वाहन नेण्यात आले हे नमूद करणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की पोलीस गस्त ही रात्रीच्यावेळी असते. हे म्हणणे खरे आहे की पोलीस गस्त व गुन्हयाचे तपासकाम या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. हे म्हणणे खरे नाही की दि.०७/०९/२०१८ रोजी वेंगुर्ला पोलीस ठाणेमधून प्रस्तुत गुन्हयाच्या कामी शासकीय वाहन नेण्यात आले असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुतकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की मला गुन्हयासंदर्भाने माहिती मिळाली व सदरची

माहिती मी पोलीस निरीक्षक यांना दिली असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुतकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीस निरीक्षक हे मी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस दूरक्षेत्र येथे आले असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुतकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की आम्ही प्रस्तुत गुन्हयाच्याकामी दूरक्षेत्र शिरोडा येथून रवाना झालो असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुतकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला विश्वसनीय माहिती मिळाली, ती आम्ही निरीक्षक यांना कळविली, त्याअनुषंगाने निरीक्षक हे पोलीस दूरक्षेत्रामध्ये आले व त्यानंतर आम्ही दूरक्षेत्र शिरोडा येथून घटनास्थळी रवाना झालो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की गुन्हयाचे तपासकाम हे प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्यानंतर सुरु होते.

०६. प्रस्तुत गुन्हयाकामी मी पंचांना तोंडी सूचना देवून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की उदय परब हा अनेक कामामध्ये पंच म्हणून साक्षीदार आहे. उदय परब यांच्याविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल होता किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की पंच हनुमान केदार हा ग्रामपंचायत भोमवाडा, ता.सावंतवाडी येथे शिपाई म्हणून कार्यरत होता व आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत भोमवाडा येथील तंटामुक्त समितीमध्ये मी सदस्य होतो. हे म्हणणे खरे आहे की पंच हनुमान केदार याची व माझी ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील परिसर हा खालचा ख्रिश्चनवाडा म्हणून संबोधला जातो. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजूबाजूस ख्रिश्चन समाजाची दाटीवाटीने वस्ती आहे. आम्ही घटनास्थळी शासकीय गणवेशात गेलो होतो. माझ्या म्हणण्याप्रमाणे घटनास्थळी आम्ही पोहोचल्यानंतर काही लोक जमा झाले व त्यापैकी काही लोक माझ्या परिचयाचे होते. मी उपस्थित लोकांपैकी कोणालाही पंच म्हणून साक्षीदार राहण्यास विचारणा केली नाही. उदय विठ्ठल परब हा सातत्याने शिरोडा बाजारामध्ये येतो किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की पंच उदय परब याची व माझी ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही पंच घटनेच्यापुर्वीपासून माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की दोन्ही पंच हे माझ्या ओळखीचे असल्याने मी

**नि.फौ.ख.क्र. ३९/२०१९**
**निशाणी ३३**

त्यांना प्रस्तुतकामी साक्षीदार म्हणून घेतले आहे.

**आरोपीतर्फे वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक- ११/०३/२०२६